# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

Estd-1962
NAAC 'A++' Grade

## ५९ वा दीक्षांत समारंभ

## विद्यार्थ्यांसाठी अधिसूचना

१) विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहूउद्देशिय सभागृहात बुधवार दि. २९ मार्च, २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून मा. श्री. रमेश बैस, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व कुलपती शिवाजी विद्यापीठ तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. पद्मश्री डॉ. संजय धांडे, माजी संचालक, भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय.आय.टी.) कानपूर, तर सन्माननीय अतिथी म्हणून मा. ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील, मंत्री उच्च व तंत्र शिक्षण हे उपस्थित राहणार आहेत.

२) ५९ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठ स्तरावर केंद्रीय पद्धतीने होणार आहे.

३) दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आवाहनानुसार व विद्यापीठ अधिकार मंडळाने निश्चित केल्याप्रमाणे पांढऱ्या रंगाचे खादी सलवार कुर्ता/कमीझ किंवा जोधपुरी (पुरुषांसाठी) व पांढऱ्या/मोती रंगाची खादीची साडी किंवा सलवार कुर्ता (महिलांसाठी) असा पोषाख परिधान करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

४) ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना टपालाव्दारे (By Post) पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्याचा विकल्प निवडला आहे. त्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ संपन्न झालेवर अर्जावरील पत्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.

५) सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना Through College / In person असा विकल्प निवडला आहे. अशा स्नातकांची पदवी प्रमाणपत्रे विद्यापीठामध्ये दीक्षांत समारंभादिवशी सकाळी ७:३० ते ११:०० या वेळेत आणि समारंभ संपल्यानंतर दुपारी २:०० ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत विद्यापीठामध्ये वितरण व्यवस्थेव्दारे वितरीत केली जातील. (स्नातकांनी पदवीप्रमाणपत्र स्वीकारताना शासकीय ओळखपत्र (आधारकार्ड/पॅनकार्ड/मतदान ओळखपत्र इ. यापैकी एक) वितरण अधिकारी यांना दाखवून पदवी प्रमाणपत्रे प्राप्त करावीत.)

६) दूरशिक्षण अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची पदवीप्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ संपन्न झालेवर अर्जावरील पत्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.

७) ५९ व्या दीक्षांत समारंभासाठीच्या व्यासपीठावर देण्यात येणाऱ्या पारितोषिक प्राप्त, व्यासपीठाव्यतीरिक्त पारितोषिक प्राप्त तसेच पीएच.डी. स्नातकांची यादी व पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/59convocation) या सदरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

८) पदवीप्रमाणपत्र क्रमांक माहितीसाठी विद्यापीठ संकेत स्थळावर दिलेल्या लिंकचा वापर करावा.
link—https://studentapps.unishivaji.ac.in/findbooth/

डॉ. अजितसिंह एन. जाधव
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दीक्षांत विभाग
दि .: २८/०३/२०२३